**कृषि तंत्र विद्यालय, बुलडाणा या कार्यालयाचे प्रक्षेत्रावरिल सन २०२५–२०२६ या हंगामातील गावरान चिंच फळांचे जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

---

१) लिलावात भाग घेव इच्छीणाऱ्या व्यक्तीने बोली बोलण्यापुर्वी स्वत:च्या खात्री करीता प्रक्षेत्रावरील झाडावरील पुर्ण फळांची पुर्णपने पहाणी करून घ्यावी. लिलावानंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

२) लिलावाकरिता बाहेरून येणाऱ्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे किंवा भत्ता दिल्या जाणार नाही.

३)जाहीर लिलाव बोली बोलण्यापुर्वी प्रत्येक व्यक्तीस रुपये १०००.०० अनामत रक्कम लिलाव अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल. त्याशिवाय लिलावात भाग घेता किंवा बोली बोलता येणार नाही.

४) लिलावात (भाग) बोली बोलणाऱ्या इसमांची संख्या ३ पेक्षा कमी असल्यास त्या दिवसाचा लिलाव रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे. या बाबत लिलाव समितीचा निर्णय अंतीम राहील.

५) लिलावात सर्वात जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीच्या नावाने लिलाव मंजूर करण्यात येईल.

६)ज्या इसमाच्या नावाने लिलाव मंजूर होईल त्या व्यक्तीस लीलावाचे वेळी व जागेवरच एकूण लिलाव १००% रक्कम रोख भरावी लागेल. रक्कम भरल्याशिवाय त्यावर केलेल्या लिलावाची विक्री निश्चीत समजल्या जाणार नाही.

७) लिलावात बोली मंजुर झाल्यानंतर १००% रक्कम ताबळतोब भरण्यास नकार दिल्यास अथवा असमर्थता दर्शविल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व ती परत केल्या जाणार नाही.

८) प्रथम क्रमांकाची बोली बोलणाऱ्या व्यक्तीने लीलाव मंजुर झाल्यानंतर १००% रक्कम भरण्यास नकार दिला अथवा असमर्थता दर्शविल्यास दुसऱ्या क्रमांकाची बोली बोलणाऱ्या इसमास लिलाव समितीचे संमतीने देण्यात येईल. या बाबतचा निर्णय लिलाव समितीचा अंतीम राहील. दुसऱ्या क्रमांकाची बोली बोलणाऱ्या इसमाने लिलाव घेण्यास नकार दिल्यास सदरचा लिलाव त्यादिवसापूरता रद्द करण्यात येईल.

९) लिलावाची बोली कमी अथवा अवाजवी वाटल्यास लिलाव रद्द करण्याचा निर्णय लिलाव समितीकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

१०) लिलावात झाडावरील फळे विकल्यानंतरची झाडावरील फळांची राखन करण्याची संपूर्ण जबाबदारी लिलाव घेणाऱ्या व्यक्तीवर राहील. त्याकरिता संस्था/कार्यालय जबाबदार राहणार नाही. फळांची काढणी व राखणी करते दरम्यान होणाऱ्या कोणत्याही मालाचे नुकसानास संस्था/कार्यालय जबाबदार राहणार नाही.

कृ. मा. पहा

११) प्रक्षेत्रावरील संपूर्ण झाडावरील फळे विहीत मुदतीत तोडून घ्यावी लागतील. त्यानंतर झाडांवर राहीलेल्या फळांवर फळे घेणाऱ्या इसमाचा अधिकार राहणार नाही व झाडावरील फळे तोडतांना झाडांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. झाडांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास विद्यापीठ नियमानुसार नुकसान भरपाई करण्यात येईल.

१२) कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे फळांचे नुकसान झाल्यास विद्यापीठ/संस्था/कार्यालय जबाबदार राहणार नाही. या बाबतचे मा. तहसिलदार यांचे समक्ष हमीपत्र रुपये १००.०० च्या स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावे लागेल.

१३) फळांचे काढणीनंतर वाहतूक करतांना प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही याची दक्षता लिलाव घेणाऱ्यास घ्यावी लागेल. तसेच नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास लिलाव घेणाऱ्या व्यक्तीकडून विद्यापीठ नियमानुसार नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल व ती नुकसान भरपाई लिलाव बोलणाऱ्या व्यक्तीस भरपाई द्यावी लागेल याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
बुलडाणा